महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

रविवार ❖ ०५ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक १९१ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शिक्षकांवरील अतिरिक्त ताण कमी करणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

विद्यार्थ्यांच्या पाठीवरचं ओझं कमी करण्याबरोबर शिक्षकांवर शाळा व्यतिरिक्त कामाचा भारदेखील कमी करण्याचा संकल्प राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केला आहे. शिक्षकांना शाळा व्यतिरिक्त निवडणुका आणि इतर कामांचाही ताण असतो. त्यावरून शिक्षक वर्गात नाराजीचा सूर आहे. त्यामुळे शिक्षकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मंत्री दादा भुसेंनी शिक्षक आणि अधिकाऱ्याची बैठक बोलावली होती.



शिक्षकांसोबत झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांवरील असलेलं अतिरिक्त कामाचं ओझंही कमी करण्याचं आश्वासन दादा भुसेंनी दिलं. शिक्षकांकडे निवडणुका, शासकीय सर्व्हे आणि इतर कामे दिली जातात. त्यावरून राज्यातील शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर असतो. त्यावर काय उपाययोजना करता येतील याचा आढावा दादा भुसे यांनी घेतला. दरम्यान, लवकरच शिक्षक संघटनांसोबत चर्चा करून त्यांची पेंशनवर तोडगा काढला जाईल तसेच त्यांची शाळा व्यतिरिक्त कामे कमी करण्यासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे.

शिक्षण विभागाचा रोड मॅप तयार करणार

राज्याचे नवनियुक्त शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज्याच्या शिक्षण विभागाचा रोड मॅप तयार करण्यात येणार असल्याचं सांगितलं. विद्यार्थी, पालक, शिक्षक सर्वांशी चर्चा करून प्राधान्यक्रम ठरविणार आहे. नाशिक जिल्ह्यात आदर्श शाळांची संख्या २०० च्या वर आहे. स्वच्छता गृह, शाळा दुरुस्ती, ई - शाळा सुरू करणे, असे अनेक उपक्रम राबवणार असल्याची माहिती दादा भुसे यांनी दिली.

ज्या संवेदनेने त्यांनी शिक्षण विभागाची जबाबदारी माझ्याजवळ दिली आहे, हे एक मोठं आव्हानात्मक काम आहे.

## शिक्षणमंत्र्यांचं आश्वासन

परंतु सर्व विभाग झपाटून काम करेल. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून आम्ही येणाऱ्या काळात चांगल्यात चांगले काम करून दाखवण्याचा प्रयत्न करू असं दादा भुसे यांनी म्हटलंय.

प्रत्येक शाळेच्या दारी शिक्षणमंत्री दिसणार

या विभागात रिझल्ट ओरिएंटेड काम दिसेल. शालेय शिक्षण मंत्री यापुढे तुम्हाला गाव खेड्यांमध्ये शाळांमध्ये व्हिजिट करणारे दिसतील. शिक्षण विभाग देखील शाळेच्या दारी यापुढे नक्कीच दिसेल. एकंदरीत गरिबातील गरीब विद्यार्थ्याला चांगलं शिक्षण मिळवण्याचा प्रयत्न आपण सर्व मिळून करू, असेही दादा भुसे म्हणाले.

# एसटी महामंडळातील सर्व प्रकल्पांची चौकशी करावी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळात अनेक प्रकल्प चुकीच्या पद्धतीने राबविण्यात येत असून त्यात सरकारी अधिकाऱ्याकडून हस्तक्षेप होत आहे. परिणामी एसटीचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असून भाडेतत्त्वावर घेण्यात येणाऱ्या १,३१० गाड्यांच्या निविदा प्रक्रियेतील दर पूर्वीच्या तुलनेत जास्त आहेत. किंबहुना एखाद्या कंत्राटदाराला फायदा होईल, अशा प्रकारच्या अटी निविदेत समाविष्ट करण्यात आल्या असतील तर त्याची चौकशी करायलाच हवी. या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्णय समर्थनीय असून एसटीतील इतरही सुरू असलेल्या सर्व प्रकल्पांची चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केली आहे.

एसटीत राबविल्या जाणाऱ्या सर्वच प्रकल्पांचे प्रस्ताव सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येतात. हे प्रस्ताव शासन दरबारी अनेक महिने पडून राहतात. त्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून हस्तक्षेप होतो. निविदा प्रक्रियेत सहभागी कंपन्यांना भेटीसाठी बोलावले जाते. अपेक्षित कंपनीला कंत्राट देण्यासाठी निविदेतील अटी व शर्ती कशा पद्धतीने असाव्यात व ठराविक कंपन्यांना फायदा व्हावा यादृष्टीने कधी कधी राजकीय दबावही येतो. पण याची खरोखरच चौकशी करायची असेल तर एसटीच्या व्यवस्थापनाकडून सादर करण्यात आलेल्या या संदर्भातील प्रस्तावांमधील मूळ टिप्पण्या व मंत्रालयात पाठवलेल्या तारखा तपासाव्यात. मग सर्व प्रकरणाचा छडा लागेल, असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले.

## महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसची मागणी

एसटी महामंडळात १,३१० भाडेतत्वावरील बस, विजेवरील बस, एलएनजीवरील गाड्या, स्वमालकीच्या २,४७५ नवीन बस हे सर्व प्रकल्प राबविण्यात मंत्रालयातून हस्तक्षेप झाल्याची दाट शकता आहे. परिणामी, एसटीचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे.



# आमदार किसन कथोरे यांची घोटसई गावातील ताडोबा मंदिरास भेट



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/टिटवाळा(प्रतिनिधी) :** कल्याण तालुक्यातील घोटसई ग्रामपंचायत हद्दीतील ताडोबा मंदिराचा परिसर खोदल्यामुळे येथील पुरातन मंदिर धोक्यात आले आहे. यामुळे ग्रामस्थ सांतप्त झाले आहेत.

येथील डोंगराचे उतखखनन करण्यात आले आहे. नाशिक येथील विधानपरिषद सदस्यांनी ही जागा विकत घेतली आहे. येथे त्यांनी बांधकाम सुरु केले आहे. मात्र घोटसई ग्रामस्थांचे पुरातन ताडोबा देवस्थान या बांधकामात धोक्यात आले आहे. यामुळे ग्रामस्थ सांतप्त झाले आहेत.

ग्रामस्थांची भावना व जागा मालक यांच्यात गेली अनेक दिवस संघर्ष सुरु आहे. देवस्थान वाचविण्यासाठी ग्रामस्थांची भूमिका लक्षात घेऊन आमदार किसन कथोरे यांनी या देवस्थानास भेट दिली यावेळी टिटवाळा पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, सरपंच राजू मगर, कांबरे बाबा, योगेश धुमाळ, माणिक मगर, काशिनाथ मगर, यांच्या सह ग्रामस्थ मोठया संख्येत उपस्थित होते. ग्रामस्थ ताडोबा देवस्थान जागा तशीच ठेवावी या भूमिकेवर ठाम आहेत.


येथील जमिनीचे उतखन्नन मोठया प्रमाणात झाले आहे. मात्र त्या प्रमाणात रॉयल्टी घेतली नसल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

# ठाणे भाईंदर प्रकल्प मार्गी लागणार

## 'एमएमआरडीए'च्या निविदेला लक्षणीय प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

ठाणे-भाईंदरदरम्यानचा अतिवेगवान प्रवास आणि वाहतूक कोंडीमुक्तीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दोन महत्त्वाकांक्षी गायमुख-फाऊंटन हॉटेल नाका बोगदा आणि फाऊंटन हॉटेल नाका-भाईंदर उन्नत रस्ता हे दोन प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यासाठी 'एमएमआरडीए'ने काही महिन्यांपूर्वी एकत्रित निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. नुकत्याच त्या खुल्या करण्यात आल्या असून त्याला पाच कंपन्यांनी प्रतिसाद दिला. निवडणूक रोखे खरेदीतील चर्चित 'मेघा इंजिनीअरिंग' आणि 'नवयुग इंजिनीअरिंग'सह अन्य दोन कंपन्यांच्या निविदांचा यात समावेश आहे.



निविदांची छाननी करून आर्थिक निविदा खुल्या केल्या जातील. निविदा प्रक्रियेअंती नियुक्त करण्यात येणाऱ्या कंत्राटदारावर प्रकल्पाचे आरेखन तयार करण्यासह बांधकामाची जबाबदारी असेल. मात्र निविदेची संपूर्ण प्रक्रिया, प्रकल्पासंबंधीची पुढील कार्यवाही पूर्ण करून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यासाठी आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागेल.

प्रकल्प असा

- ठाणे आणि मुंबईतील प्रवासाचे अंतर कमी करण्यासाठी 'एमएमआरडीए'चा ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्प
- ठाणे-भाईंदर अंतर कमी करून यादरम्यानचा प्रवास अतिजलद करण्यासाठी 'एमएमआरडीए'चा गायमुख- फाऊंटन हॉटेल नाका दुहेरी बोगदा

फाऊंटन हॉटेल नाका-भाईंदर उन्नत रस्ता.

दोन्ही प्रकल्पांचे एकत्रित काम

- बोगदा प्रकल्प ५.५ किलोमीटर लांबीचा, तर उन्नत रस्ता १० किलोमीटर लांबीचा
- संपूर्ण प्रकल्पासाठी २० हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित
- नवयुग इंजिनीयरिंग, मेघा इंजिनीयरिंग, एल ॲण्ड टी, ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर आणि ऋत्विक प्रोजेक्टर या पाच कंपन्यांच्या निविदा प्राप्त

# आदेश देऊनही बेकायदा झोपड्यांवर कारवाई नाही

## न्यायालयाने एल प्रभागाच्या माजी सहाय्यक आयुक्तांना ठरवले दोषी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या मुंबईतील बेकायदा बांधकामांच्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या समस्येबाबत उच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे. त्याचवेळी. पूर्व द्रुतगती महामार्गाजवळील एव्हरर्ड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीच्या बाहेरील बेकायदेशीर झोपडपट्ट्या पाडण्याच्या २०१५ मध्ये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात अपयशी ठरल्याबद्दल न्यायालयाने एल प्रभागाच्या माजी सहाय्यक आयुक्तांना दोषी ठरवले.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठाने महापालिकेच्या 'एल' प्रभागाचे माजी सहाय्यक आयुक्त अजित कुमार आंबी यांना अवमानप्रकरणी दोषी धरताना २७ जानेवारीपर्यंत शिक्षेच्या मुद्यावर उत्तर देण्याचे आदेशही यावेळी दिले. सोसायटीच्या बाहेरील पदपथावर अतिक्रमण करणाऱ्या झोपडपट्टीवासीयांनाही पाडकाम आदेशाला स्थगितीची मागणी करताना तथ्य लपवल्याप्रकरणी पाच लाख रुपयांचा दंड न्यायालयाने आकारला. त्याचप्रमाणे, झोपड्यांवर कारवाई करून परिसर पूर्ववत करण्याचे, प्रस्तावित डीपी रस्त्याचे काम जलगदतीने करण्याचे आणि आदेशाचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली याचा तपशील सादर करण्याचे आदेश देखील न्यायालयाने महापालिकेला दिले.


न्यायालयाने १८ जून २०१५ रोजी महा पालिकेला बेकायदा झोपड्या आणि शौचालय सहा महिन्यांत पाडण्याचे आदेश दिले होते. वारंवार स्मरणपत्रे देऊनही महापालिकेने निवडणुकीसारखी कारणे देऊन कारवाईला विलंब केला. त्यानंतर, सोसायटीने २०१७ मध्ये या प्रकरणी अवमान याचिका दाखल केली. त्यावर, निर्णय देताना न्यायमूर्ती गडकरी आणि न्यायमूर्ती खाता यांच्या खंडपीठाने आंबी यांना अवमानप्रकरणी दोषी ठरवून कायद्याने पालन न करणे हे त्याच्या मूळावर आघात करण्यासारखे असल्याचे निरीक्षण नोंदवले.

सोसायटीने २००० मध्ये सर्वप्रथम न्यायालयात धाव घेतली होती व सोसायटीच्या संरक्षक भिंतीला लागून असलेल्या ६० फूट रुंद रस्त्यावरील बेकायदा बांधकामांचा मुद्दा उपस्थित केला होता. सोसायटीची जमीन महापालिकेने विकास आराखडा (डीपी) रस्त्यासाठी संपादित केली होती, परंतु, त्यावर बेकायदा झोपड्या उभ्या राहिल्या. न्यायालयाने २०१५ मध्ये या झोपड्या बेकायदा ठरवून त्यांच्यावर कारवाईचे आदेश देऊनही झोपडीधारकांना पुनर्वसनास पात्र असल्याचा दावा केला होता. परंतु, आदेश देण्यात आले त्यावेळी या झोपड्यांचा परिसर झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला नव्हता, असे नमूद करून न्यायमूर्ती गडकरी आणि न्यायमूर्ती खाता यांच्या खंडपीठाने त्यांचा हा दावा फेटाळला.

म्हणून बेकायदा बांधकामांची संख्या वाढती महापालिका अधिकारी, नगरसेवक आणि पोलिसांकडून बेकायदा बांधकामांना संरक्षण दिले जाते. परिणामी, मुंबईतील बेकायदा बांधकामे वाढतच चालली असून त्यामुळे कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांना वेठीस धरले जाते. त्यांना न्यायासाठी न्यायालयाची पायरी चढावी लागत असल्याची टिप्पणीही खंडपीठाने केली. महापालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे सोसायटीला २४ वर्षे बेकायदा बांधकामे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा त्रास सहन करावा लागल्याचे सोसायटीचे म्हणणेही न्यायालयाने योग्य ठरवले.




# मुंबईत आगीचं सत्र सुरुच वांद्रे परिसरात झोपडया जळून खाक



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**


मुंबईत आगीचं सत्र सुरुच आहे. मुंबईच्या वांद्रे परिसरात आग लागल्याची घटना घडली आहे. या परिसरातील झोपड्यांना आग लागली आहे. या आगीमुळे परिसरात धुराचे प्रचंड लोट पाहायला मिळत आहे.

आग लागल्याची घटना घडताच अग्निशमन दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईच्या वांद्रे पूर्व भागात असलेल्या तीवराच्या जंगाला ही आग लागली. या लागलेल्या आगीत तीवरा जंगलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. परिसरात धुराच या आगीच २५ ते ३० कच्च्या झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. या आगीत सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच धावपळ उडाली. अग्निशमन दलाचे जवानांनी घटनास्थळी पोहोचून आगीवर नियत्रंण मिळवण्यास सुरुवात केली. या जवानांनी पाण्याचा फवारा मारण्यास सुरुवात केली.

# कल्याण - तळोजा मार्गाचा 'मेट्रो मार्ग १२' प्रकल्प विक्रमी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**

मुंबई आणि महानगरात सुरु असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची कायमच नवनवीन विक्रम रचले आहे. अशावेळी कल्याण-तळोजा या मेट्रो १२ मार्गाच्या कामादरम्यान एक अनोखा विक्रम रचण्यात आला आहे.देशातील सर्व महानगरांमध्ये सुरु असणाऱ्या मेट्रो कामांमध्ये मेट्रो १२ने डिसेंबर या केवळ एका महिन्यात ३७ पाइल कॅप उभारण्याचा अनोखा विक्रम केला आहे. देशभरात आजपर्यंतचा विक्रम हा ३५ पाइल कॅप उभारून करण्यात आला आहे, असा अंदाज



हा विक्रम शेअर करत सोशलमिडीया शेअरकर्त्यांनी वर्तविला आहे. 'कल्याण ते तळोजा' 'मेट्रो मार्ग १२' हा एकूण २३.७ किमी लांबीचा असून या मार्गावर १९ स्थानके आहेत. या उन्नत मार्गाचा शुभारंभ झाल्यावर लगेचच पायलिंगच्या कामाला सुरुवात झाली. ही मेट्रो मार्गिका मुंबई महानगर प्रदेशातील दक्षिण मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई, विरार, मीरा-भाईंदर शहरांना जोडते. या मेट्रो मार्गांच्या एकत्रित प्रगतीमुळे महामुंबई मेट्रोचे जाळे अधिक विस्तारणार असून त्याचा लाखो प्रवाशांना फायदा होईल. या मेट्रो प्रकल्पांमुळे येणाऱ्या वर्षात एमएमआर क्षेत्रातील वाहतूक पायाभूत सुविधा अधिक बळकट होईल. या मेट्रो मार्गाचे ४% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या निळजे डेपोच्या जमीनीचे अंशतः अधिग्रहण झाले असून उर्वरीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे, अशी माहिती एमएमआरडीएने दिली आहे.





## वाचकांचे पत्र

प्रति,
माझ्या वाचक मित्रमंडळींकडून आपल्या पेपरची माहिती मिळाली. त्यांच्याकडून आपले बरेच कौतुक ऐकले होते. त्यानंतर त्यांनी मला पाठवलेल्या आपल्या पेपर मधील माहिती वाचून मला सुद्धा छान वाटले. आपल्या पेपरमध्ये आपल्या जिल्ह्यातल्या स्थानिक बातम्या त्याचप्रमाणे विविध विषयांवर लेख वाचावयास मिळाले. त्यानंतर मी ठरवले आपला पेपर नियमित वाचत राहीन. आणि इतर माझ्या मित्र परिवाराला देखील वाचावयास सांगेन असा आहे. आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!
धन्यवाद

आपली वाचक
अमृता जाधव

## गीतासार



*अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।*
*युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः । १-४ ।*
*धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।*
*पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः । १-५ ।*
*युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान्।*
*सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः । १-६ ।*

अर्थ
या सैन्यात मोठीमोठी धनुष्ये घेतलेले भीम, अर्जुन यांसारखे शूरवीर, सात्यकी, विराट, महारथी द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, बलवान काशिराज, पुरुजित, कुंतिभोज, नरश्रेष्ठ शैब्य, पराक्रमी युधामन्यू, शक्तिमान उत्तमौजा, सुभद्रापुत्र अभिमन्यू आणि द्रौपदीचे पाच पुत्र हे सर्वच महारथी आहेत. । १-४, १-५, १-६ ।

*अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।*
*नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते । १-७ ।*

अर्थ
हे ब्राह्मणश्रेष्ठ, आपल्यातील जे महत्त्वाचे आहेत, ते जाणून घ्या. आपल्या माहितीसाठी आपल्या सैन्याचे जे जे सेनापती आहेत, ते मी आपल्याला सांगतो. । १-७ ।

**आरोग्य टिप्स**

## गाजर खाऊन नजर होईल तीक्ष्ण



गाजराचा तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे आहारात समावेश करू शकता. जसं की गाजरचा हलवा, गाजराचा ज्यूस, गाजराचे सॅलेड, गाजराची भाजी, गाजराचे सूप इत्यादी... गाजरात व्हिटामीन ए, बीटा कॅरोटीन असते ज्यामुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते. गाजरात एंटी ऑक्सिडेंट्स असतात ज्यामुळे शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव होतो. वय वाढण्याची प्रक्रिया संथ होते आणि शरीराला मदत होते.

# गंभीर गुन्ह्यातील साक्षीदाराला काही क्षणांत संपवलं

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात दिवसाढवळ्या खून, अपहरण, हत्या अशा गुन्हेगारींच्या घटनेत वाढ होत आहे. त्यातच आता मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या एका तरुणाची गोळया घालून हत्या करण्यात आली. मिरारोड मधील शांतीनगर परिसरात ही घटना घडली. मोहम्मद तबरेज अन्सारी असे या घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.
व्यावसायिकाची गोळया झाडून हत्या मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईजवळ असलेल्या मीरा रोड परिसरात शुक्रवारी रात्री एका व्यक्तीची गोळया झाडून हत्या करण्यात आली. मीरा रोडवरील शांती शॉपिंग सेंटरमध्ये ही घटना घडली. यात एका ३५ वर्षीय व्यावसायिकाची गोळया झाडून हत्या करण्यात आली आहे. मोहम्मद तबरेज अन्सारी असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तबरेज हा एका गंभीर गुन्ह्याचा साक्षीदार होता. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून त्याला धमक्या येत होत्या. याबद्दल तबरेज यांनी पोलिसात तक्रारही दाखल केली होती. मात्र शुक्रवारी संध्याकाळी नेहमीप्रमाणे दुकानाबाहेर उभा असताना तबरेजवर एका अज्ञात व्यक्तीने गोळीबार केला. यातील एक गोळी त्याच्या डोक्याला लागली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# 'सिद्धगड बारा लढाया' पुस्तकाचे प्रकाशन



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
मुरबाड(बाळासाहेब भालेराव) तालुक्यातील सुप्रसिद्ध इतिहास संशोधन लेखक,कवी योगेंद्र बांगर यांच्या सिद्धगडः :१२ लढाया या अपरिचित माहिती असलेल्या पुस्तकाचे शानदार प्रकाशन सिद्धगड येथे मान्यवरांच्या शुभहस्ते झाले.वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या बलिदान दिन कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित खासदार बाळया मामा म्हात्रे , आमदार किसनजी कथोरे , माजी आमदार गोटीराम भाऊ पवार ,सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांच्या शुभहस्ते झाले या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते
योगेंद्र बांगर यांनी यापूर्वी मुरबाड तालुक्याचा समग्र इतिहास लेखन करून महत्वपूर्ण कार्य केले आहे आता नव्याने सिद्धगड किल्ल्याचा दुर्मिळ व अपरिचित इतिहास सांगणारे २५ वे रौप्यमहोत्सवी पुस्तक प्रकाशित केले आहे.ऐतिहासिक कालखंडात सिद्धगड हा किल्ला मुरबाड तालुक्यातील महत्त्वपूर्ण किल्ला होता परंतु वीर हुतात्मा भाई कोतवाल , वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या आझाद दस्ता व बलिदानाचीच माहिती आतापर्यंत ज्ञात होती.परंतु या संशोधित पुस्तकामुळे सिध्दगडावर घडलेल्या इ.स. १६५६ ते १९४३ पर्यंतचा मुरबाड प्रांताचा इतिहास नव्याने उजेडात आला आहे. मराठे व मोगल यांच्यामध्ये झालेल्या संघर्षाची ही ऐतिहासिक दुर्मिळ माहिती संकलित व संशोधित करून योगेंद्र बांगर यांनी इतिहास प्रेमींना इतिहासाचे नवे दालन खुले करून दिले आहे या पुस्तकाचे डीटीपी,सजावट योगेश चंद्रकांत तेलवणे, मुखपृष्ठ सचिन पोतदार, तर मांडणी महेश घावट यांनी केली आहे ना ना ना तोटा या तत्वावर पुस्तक असून मागणी वाढल्याने पुस्तकाची प्रकाशन पूर्व पहिली आवृत्ती संपली असून इतिहास प्रेमीच्या कडून योगेंद्र बांगर यांचे कौतुक होत आहे.

# सेवानिवृत्ती नंतरही देशसेवा व समाज सेवा कायम करणार



**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
भारतीय सैन्य दलात सतरा वर्ष प्रदीर्घ सेवा केल्यानंतर सेवानिवृत्ती घेऊन गावी परतलेल्या हवालदार मंगेश पाटील यांचे वरसई फाटा ते आष्टे येथे मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात, भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा हातात घेऊन, भारत माता की जय जय जवान जय किसान अशा घोषणा देत फुलांची उधळण करून, त्यांची रथामधून मिरवणूक काढण्यात आली .यावेळी गागोदे, वरसई, वशिवली, आष्टे आदि ठिकाणी मिरवणूक काढून त्यांचे औक्षण करण्यात आले.
पेण तालुक्यातील आष्टे गावातील मंगेश पाटील यांनी वरसई येथील कै पू. ग. गोडसे विद्यालय मध्ये १० वी पर्यत शिक्षण घेऊन पुढील शिक्षण पेण मध्ये केले , सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील व ग्रामीण भागातील तरुण लहानपणा पासून सैन्य दलात जायची इच्छा मनाशी बाळगून असल्यामुळे प्रयत्नशील होता व त्यातूनच तो भारतीय सैन्य दलात १७ वर्ष भारताच्या विविध कानाकोपऱ्यात सैन्य दलात सेवा केल्यानंतर हवाल दार मंगेश पाटील सेवानिवृत्ती घेऊन तो १ जानेवारी २०२५ रोजी आपल्या मूळ गावी आष्टे येथे परतला. येथे भव्य दिव्य असे स्वागत करण्यात आले. भारत माता की जय, जय जवान जय किसान, घोषणा व फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण यामुळे वातावरण देशमय झाले होते. ढोल ताशाच्या गजरात कारमधून मिरवणूक काढण्यात आली तसेच वरसई विभागातील ग्रामस्थ, विविध संस्था ,संघटना यांच्या वतीने शाल ,पुष्पगुच्छ, पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.
सेवानिवृत्त व सत्कारमूर्ती हवालदार मंगेश पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की,गावातील सर्वांनी एकत्र येऊन माझे जे अभूतपूर्व स्वागत केले, जो सन्मान केला, त्यामुळे मी खूपच भारावून गेलो आहे. देशसेवा करताना माझे घर, माझी शाळा, माझे गाव, माझे मित्र, याची मला नेहमी आठवण येत होती, देशसेवेमध्ये जो आनंद, स्वाभिमान ,अभिमान, शिस्त, स्वावलंबन व प्रामाणिकपणा शिकायला मिळाला. तो खूप मोठा आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर मनाला वाईट वाटते. मात्र यापुढेही इतर प्रकारे का होईना देश सेवा, समाज सेवा करत राहणार. व गावातील इतर तरुण मुलांना देश सेवेसाठी जाण्यासाठी प्रेरणा देत राहील. असे सांगितले व माझे स्वागत, माझा सन्मान केला त्याबद्दल सर्वांचे यावेळी त्यांचे आभार मानले.
यावेळी माजी सैनिक, वरसई विभागातील कार्यकर्ते, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार रोहित पाटलांच्या पाठपुराव्याला यश

## महिला पोलिसाच्या मुलाच्या दुर्मिळ आजारावर मोफत उपचार होणार



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तासगाव कवठे महांकाळ मतदारसंघाचे आमदार रोहित पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आलंय. ठाणे पोलीस आयुक्त येथिल महिला कर्मचारी कविता सांगळे यांचा मुलगा अथर्व सांगळे याला र्ऊल्मी हा दुर्मिळ आजार झाला आहे. या आजारावरील उपचार महाग असल्याने महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतंर्गत हा सर्व खर्च करण्यात यावा याबाबतचे पत्र रोहित पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलं होत. रोहित पाटील यांच्या पत्राची दखल घेत मंत्रालयाने अथर्वच्या मोफत उपचाराला मंजुरी दिली आहे. त्यामुळे अथर्वच्या उपचाराचा मार्ग सुकर झालाय.
याबाबत अधिक माहिती अशी कि, कविता सांगळे या ठाणे पोलीस आयुक्त कार्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा अथर्व सांगळे याला Gaucher हा दुर्मिळ आजार झाला असून या आजारावरती औषध उपचार सुरु असून यासाठी होणारा खर्च जास्तीचा आहे. सरकारी मदतीसाठी कविता सांगळे यांनी रोहीत पाटील यांचे सहकारी कल्याण डोंबिवलीचे युवा समाजसेवक तथा रुग्णसेवक अमित कोळेकर यांची भेट घेतली. अमित कोळेकर यांनी याबाबत संपूर्ण माहिती रोहित पाटील यांच्या कानावर घातली. त्यानंतर अथर्व सांगळे याच्या औषोधोपचाराचा खर्च मोफत पार पडावा यासाठी रोहित पाटील यांनी १३ डिसेंबर २०२४ रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना पत्र लिहिलं होतं.
या आजारावरील औषधोपचाराकरीता येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतंर्गत एक विशेष बाब म्हणून मंजूरी मिळण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच औषधोपचाराच्या सध्यस्थितीबाबतचा अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कार्यालयास कळविले आहे. त्यामुळे अर्थव सांगळे यास असलेल्या Gaucher ह्या दुर्मिळ आजारावरील औषधोपचाराकरीता येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतंर्गत एक विशेष बाब म्हणून मंजूरी मिळण्याबाबत शासनाचे योग्य ते आदेश कृपया निर्गमित करावेत, अशी विनंती रोहित पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांना केली होती.
यानंतर मुख्यमंत्र्यांनी सुद्धा तात्काळ यामध्ये लक्ष्य घातलं आणि आता मंत्रालयाकडून ठाणे पोलीस आयुक्त 'ऑफिस येथील कर्मचारी कविता सांगळे यांच्या मुलाच्या म्हणजेच अथर्व सांगळेच्या Gaucher's disease या दुर्मिळ आजारवरील मोफत उपचाराच्या फाईलवर आज मंत्रालयातून मंजुरी मिळाली व पुढील कारवाईसाठी ती फाईल पुढे वर्ग करण्यात आली. रोहित पाटील यांच्या पाठपुराव्या मुळेच हे सगळं शक्य झालं असं मत कविता सांगळे यांनी व्यक्त केलं आणि रोहित पाटील यांचे आभारही व्यक्त केलेत.

# पेण शहरातील थीम पार्कच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष








**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
पेण शहरातील थीम पार बद्दल पेणच्या नागरिकांची तीव्र नाराजी असुन थीम पार्क मधीलअवस्था अतिशय दयनीय आहेअबालवृद्धांना बसण्यासाठी असलेले बाकडे पूर्णपणे मोडकळीस आलेले आहेत, थीम पार्क मधल्या शौचालयाची अवस्था अतिशय बिकट अवस्थेत असून, स्त्री व पुरुष यांना दुर्गंधीचा सामना करावयास लागत आहे, सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, जिम साठी असलेले साहित्य पूर्णपणे मोडकळीस आलेले असून त्याचा वापर करणे अशक्य आहे, लहान मुलांसाठी थीम पार्क मध्ये असलेले साहित्य उदाहरणार्थ झोपाळा वगैरे खाली पडलेल्या अवस्थेमध्ये आहेत, थीम पार्क मधील विहीरीचेही पाणी अगदी दुर्गंधीयुक्त झाले असून तिची अवस्था बिकट आहे, थीम पार्क मधले सीसीटीव्ही कॅमेरे ही पूर्णपणे बंद असून तिथे कोणतीहीअनुचित घटना घडल्यास त्याचा थांगपत्ता लागणे ही मुश्किल झाले आहे, सर्वसाधारण नागरिकांसाठी पेण नगर परिषदेने सूचना फलक लावणे गरजेचे असून तिथे आजतागयत असे कोणतेही सूचनाफलक लावले नाहीत, कचरा टाकण्यासाठी लावलेले डस्टबिनची अवस्था बिकट आहे तिथे नगरपालिके मार्फत कोणत्याही सफाई कामगाराकडून स्वच्छतेची तरतूद केली जात नाही या सर्व बाबी वेळोवेळी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन, तसेच अनेक अनेक वेळा पत्रव्यवहार करून सुद्धा प्रशासन तिथे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे, यां बाबीकडे लक्ष वेधण्याचे पेण मधील, माझे पेण संघटना, मॉर्निंग वॉकर्स ग्रुप, ज्येष्ठ नागरिक संघटना पेण, छावा संघटना पेण, म्हाडा कॉलनीतील रहिवाशी, तसेच पेणचे सुजाण नागरिक अनेक महिन्यापासून मागणी करत आहेत तरी प्रशासनाचा कारभार ढिम्म आहे याबाबत पेण शहरातील नागरिकांनी प्रशासना विरोधात खंत व्यक्त केली.

# कोकण विभागाचे शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांचा सन्मान सोहळा संपन्न






**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता**
**अंबरनाथ(प्रतिनिधी)**
आज दिनांक ०२.०१.२०२५ रोजी 'आझाद दस्ता क्रांतीवीर' स्मारक समिती वांगणी ता. अंबरनाथ यांनी वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील व भाई कोतवाल यांच्या 'हुतात्मा स्मृतिदिनानिमित्ताने' कोकण विभागाचे शिक्षक आमदार माननीय ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांचा सन्मान सोहळा आयोजित करून त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला, सर्वांना हवाहवासा असणारा, अल्पावधीतच सर्वांच्या मनामध्ये घर करणारा, सर्वांच्या मदतीला धावून जाणारा, हक्काचा आमदार जो 'विद्यार्थी व शिक्षकांची प्रामाणिकपणे सेवा करीत आहे ', सामाजिक, शैक्षणिक कार्यासाठी विधिमंडळात सतत प्रश्न उपस्थित करून, सरकार दरबारी पाठपुरावा करून अनेकांना न्याय अंबरनाथ, या संस्थेला 'वीर हुतात्मा हिरजी गोमाजी पाटील' नाव देउन वीर हुतात्म्यांचे इतिहास नवीन पिढीसाठी जागृत केला, त्याचबरोबर बदलापूर येथील वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील चौकाचे सुशोभीकरण केल्याबद्दल आझादस्त स्मारक समितीच्या वतीने 'सन्मानपत्र' देऊन सन्मान केला .
आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की हिराजी गोमाजी व पाटील व भाई कोतवाल यांचा इतिहास संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कळवा म्हणून शालेय अभ्यासक्रमामध्ये क्रांतिवीर हिराजी गोमाजी पाटील व भाई कोतवालांचा धडा पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणार, तसेच ठाणे रायगड पालघर जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये हिराजी गोमाजी पाटील व भाई कोतवाल यांचे तैल चित्र व त्यांच्या शौर्यगाथांची माहितीचे पुस्तक देऊन त्यांच्या कार्याची महती पोहोचवण्याचे कार्य करू
यावेळी , एकनाथ मोरेश्वर शेलार, शरद म्हात्रे, मनोहर शेलार, नामदेव बैकर, गौतम गोडांबे, जयेश कालेकर, मच्छिंद्र भोईर, भालचंद्र कांबरी , मुख्याध्यापिका मनीषा नामदेव बैकर, बबन क्षीरसागर, अभिजीत शेलार आणि अनेक मान्यवर व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## आजचे राशीभविष्य

**मेष**
कुटुंबासोबत वेळ घालवाल. यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. आज तुमच्या आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील.

**वृषभ**
आज व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर घरातील ज्येष्ठांचे मत अवश्य घ्या.

**मिथुन**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल.वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

**कर्क**
तुम्ही सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.

**सिंह**
राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते. नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या**
तुम्ही घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल आणि तुमचे व्यवहारही जलद होऊ शकतात.तुम्हाला एखादी मोठी जबाबदारी मिळू शकते .

**तूळ**
जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल. तुम्ही जे काम करण्याचा प्रयत्न कराल. त्या कामात तुम्हाला यश मिळेल. तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल.

**वृश्चिक**
तुमचे मनोबल वाढेल.आव्हानांचा सामना कराल. तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल.तुमच्या सर्व अडचणी दूर होतील.

**धनु**
तुमचे आरोग्य चांगले राहील.महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे जे कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत आहेत. काम करताना घाई करू नका.

**मकर**
कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता.अभियंत्यांसाठी आजचा दिवस फायदेशीर असणार आहे.

**कुंभ**
तुमच्या करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल. मुलांसोबत वेळ घालवाल.

**मीन**
ऑफिसमध्ये चांगल्या कामगिरीसाठी तुमचा सन्मान होऊ शकतो. आज तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होतील. सर्व समस्या दूर होतील.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ मराठा समाजाचे तहसीलदारांना निवेदन



**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता**
**मुरबाड(प्रतिनिधी)**
कै.स्व.संतोष देशमुख ,सरपंच मस्साजोग बिड यांच्या झालेल्या निगुर्ण हत्तेच्या निषेधार्थ ठाणे जिल्हा देशमुख मराठा समाज मंडळच्या वतीने मुरबाड तहसील दारांना निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात मराठा समाजाकडून सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांचा शोध घेऊन कठोर शिक्षा व्हावी. अशी मागणी करण्यात आली आहे
शिक्षेच्या मागणीचे निवेदन देताना ठाणे जिल्हा देशमुख मराठा समाजाचे जिल्हा कार्याध्यक्ष जयवंत सूर्यराव, मंडळाचे संचालक प्रवीण सूर्यराव, मनीष हिंदुराव, मुरबाड शहराध्यक्ष दिलीप देशमुख, तुकाराम चौधरी भाऊराव पवार, प्रशांत यशवंतराव रोहित झुंजारराव,सचिन सूर्यराव आदी पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# मुरबाड मध्ये पोहोचली आकाशवाणी मुंबई



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता / मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

चंद्रावर जाणं आणि केंद्रावर जाण सारखच आहे असे पूर्वी लोक म्हणायचे ही बाब आकाशवाणी केंद्राबद्दल लोक नेहमीच चर्चा करायचे अशाच आकाशवाणी मुंबई केंद्राचे सहाय्यक निर्देशक डॉ. संतोष जाधव जेव्हा मुरबाड तालुक्यातील वाकल वाडी या सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वाडी मध्ये आकाशवाणी मुंबई केंद्र वाकलवाडीमध्ये अशी चर्चा सुरू झाली होती त्याचे निमित्त होते जीवन रेखा फाउंडेशन या संस्थेचा जिल्हा उद्योग केंद्र ठाणे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या मार्गदर्शन शिबिराला जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक शेखर धारणकर व मनोज पाटील मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते याच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आकाशवाणी मुंबई केंद्राचे डॉक्टर संतोष जाधव होते उपस्थित होते त्यामुळे आकाशवाणी पोहोचले वाकलवाडी अशी चर्चा मात्र यानिमित्ताने सुरू होती

जीवन रेखा फाउंडेशन व नऊ उद्योजक बनवण्यासाठी सुवर्णसंधी देणारे जिल्हा उद्योग केंद्र मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना अंतर्गत मार्गदर्शन शिबिर वाकड वाडी येथे आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमाला आकाशवाणी मुंबई केंद्राचे सहाय्यक निर्देशक डॉ. संतोष जाधव, पत्रकार बाळासाहेब भालेराव, जिल्हा उद्योग केंद्राचे शेखर धारणकर, उमेश पाटील , पत्रकार किरण कुमार थोरात, श्रमजीवी संघटनेचे ठाणे जिल्हा सचिव हनुमान तांडेल, खुटल बारागाव ग्रामपंचायतचे सरपंच माधुरी शेट्टी, माजी सरपंच शंकर सोंगाळ, सामाजिक कार्यकर्ते अरुण बागुल कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे तानाजी घागस एडवोकेट दिनेश हरड संस्थेचे खजिनदार राहुल प्रभाकर मोरे संस्थेचे सचिव रमेश घरत उपसरपंच पठारे, ग्रामविकास अधिकारी निरगुडा यांच्यासह वाकलवाडी ग्रामस्थ महिला तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉक्टर संतोष जाधव म्हणाले की सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या वाकरवाडी सारख्या दुर्गम भागात माझ्यासारख्या व्यक्तीला येण्याचे हे भाग्य लाभले आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाची खरी परिस्थिती बघायला मिळाली आकाशवाणी सारखे माध्यम पोहोचले आहे माझ्या माध्यमातून ह्या ठिकाणी आकाशवाणीचा संवाद येथील ग्रामीण जनतेशी झाल्याचा आनंद मला मिळत आहे.

# ठाणे महापालिकेच्या सहायक आयुक्तांना मारहाण

## अतिक्रमण काढताना बाप-लेकाने दिली धमकी

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

कल्याण फाटा परिसरातील अटलांटा बिल्डिंगच्या शेजारी असलेल्या अतिक्रमणांवर कारवाई सुरू असताना पाठीमागून आलेल्या बाप-लेकाने सहायक आयुक्त भालचंद्र घुगे यांना शिवीगाळ करून मारहाण केली. ही घटना गुरुवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली. शाहआलम शहाजहाँ खान (६३) आणि अब्दुल खान (२७) असे या बाप-लेकाचे नाव आहे. घटनेप्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती डायघर पोलिसांनी शुक्रवारी दिली. घुगे यांनी दिवा प्रभाग समितीचा पदभार घेतल्यानंतर या भागातील बेकायदा बांधकामे तसेच फेरीवाले यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कारवाई सुरू केली. त्यानुसार २ जानेवारी रोजी दुपारी घुगे हे त्यांच्या पथकासह कल्याण फाटा येथील अटलांटा बिल्डिंगच्या शेजारी असलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करीत होते. कारवाईनंतर पुन्हा केले होते अतिक्रमण यापूर्वी त्याच भागातील खान यांच्या पत्र्याची शेड असलेल्या दुकानावर कारवाई केलेली असताना पुन्हा ती शेड उभारणाऱ्या खान पिता-पुत्रही ताडपत्रीच्या शेडचे उभारून अतिक्रमण करीत इंजिन ऑइलची विक्री करीत असल्याचे आढळले. सहायक आयुक्तांना दिली धमकी याच अतिक्रमणावर कारवाई करण्यासाठी घुगे गेले असता, अब्दुल्लाने घुगे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांशी वाद घालून शिवीगाळ करीत त्यांना धमकी दिली.

तर त्यांचे वडील शहाजहाँ यांनी घुगे यांच्या मानेवर हाताने जोराचा फटका मारून शिवीगाळ करीत धमकी दिली. या घटनेप्रकरणी डायघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ठाणे पलिकेच्या माजिवडा प्रभाग समितीच्या तत्कालीन सहायक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर फेरीवाल्याकडून झालेल्या भ्याड हल्ल्यात त्यांना हाताची बोटे गमवावी लागल्याची वेळ ओढवली होती. त्यानंतर पुन्हा एकदा सहायक आयुक्त घुगे यांच्यावर अतिक्रमणावर कारवाईदरम्यान हल्ला झाल्याची घटना घडली. या घटनेचा सर्वच स्तरातून संताप व्यक्त होत आहे. भ्याड हल्ल्याचा निषेध घुगे यांनी बेकायदा बांधकामांवर कारवाया सुरू केल्या आहेत. अनेक ठिकाणी त्यांनी बेकायदा बांधकामांवर कारवाई केल्यानंतर बेकायदा बांधकाम करणाऱ्यांकडून त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. हा हल्ला करणाऱ्यांवर पोलिसांकडून आणि पालिकेकडून कठोर कारवाई झाली पाहिजे. भ्याड हल्ला करणाऱ्यांचा आम्ही जाहीर निषेध करतो, असे शिवसेनेचे (यूबीटी) दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे म्हणाले.

# पत्रकार संजय कांबळे यांच्या घरी व्ही व्हीआयपी अधिकारी व लोकप्रतिनिधींची मांदियाळी



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी)**

ठाणे जिल्ह्यातील जेष्ठ निर्भीड, अभ्यासू पत्रकार संजय जयवंत कांबळे यांच्या कल्याण(वरपगांव)येथील नवीन घर प्रवेशा निमित्ताने त्यांना आशीर्वाद देण्यासाठी राज्यातील अतिवरीष्ठ व्हीआयपी अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी उपस्थिती दर्शवली, त्यामुळे असे हे पहिल्यांदा च घडल्याचे उपस्थित ग्रामस्थ, नागरिक यांनी सांगितले.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या३जानेवारी या जयंती दिनाचे औचित्य साधून ठाणे/मुंबई,/कल्याण परिसरातील जेष्ठ, अभासू,निर्भीड पत्रकार संजय कांबळे यांनी आपल्या नवीन घर प्रवेशाचा कार्यक्रम आयोजित केला होता, यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले, या कार्यक्रमाला सुशिक्षित तरुणांचे आयडॉल डॉ, रविंद्र,शिसवे,(भ्पए),पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई,महाराष्ट्र विधानसभेतील सर्वात कार्यसम्राट आमदार, सतत पाचवेळा निवडून आलेल श्री किसनजी कथोरे, आमदार, श्री कुमारजी आयलानी, कार्यसम्राट आमदार, उल्हासनगर, श्री सचिन शेजाळ, तहसीलदार,कल्याण, श्री विलास जाधव,(ACP)राज्य गुप्तवार्ता,पीएसआय श्रीम बामणे मॅंडम, श्री संजय भोये, गटविकास अधिकारी,पंचायत समिती कल्याण, श्रीम-अर्चना पवार, बालविकास अधिकारी, कल्याण, श्रीम डॉ रुपाली खोमणे, गटशिक्षणाधिकारी, कल्याण,शालेय पोषण अधीक्षक, मोटघरे मॅंडम, विस्तार अधिकारी, नाईकवडे मॅंडम,,भगत मॅंडम, मुख्य सेविका, श्रीम, उषा, लांडगे मॅंडम, मिरकुटे मॅंडम, निपुर्ते मॅंडम, त्यांचे सहकारी, कल्याण तालुका वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री सुरेश कदम, वपोनी,कल्याण तालुका वनाधिकारी, श्री रघुनाथ चन्ने,श्री शिंदे, श्री जाधव, प्रसिद्ध उद्योजक,. श्री मोहनशेठ,(बाबा) कांबा, श्री छगन शेठ,बनकरी,जीवनदिप महा विद्यालयाचे श्री रविंद्र घोंडविंदे,सिनेट, सदस्य मुंबई विद्यापीठ, श्री भरत गोंधळे, ,जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ठाणे.

श्री योगेश देशमुख, सरपंच, म्हारळ ग्रामपंचायत , श्री, प्रमोद देशमुख, मा सरपंच, सदस्य लक्ष्मण कोंगिरे,कृषी अधिकारी, एस एस संत, बाबासाहेब शिंदे, विस्तार अधिकारी, श्री घोलप, कांबा ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी,सुंनदा पाटील, वरपचे ताधाजी पाखरे,आदी वरीष्ठ व्हीआयपी अधिकारी, लोकप्रतिनिधी ,ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात होते. या कार्यक्रमासाठी कल्याण, डोंबिवली, भिंवडी, शहापूर, मुरबाड, उल्हासनगर,आदी तालुक्यातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते, तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय घारे, उल्हास घारे, सुभाष घारे, आकाश चौधरी, देवेश पडवळ, युवराज नाईक,यश चौधरी, प्रियका चौधरी, किरन आहेर, गणेश सोनावणे, इत्यादींनी मेहनत घेतली.

# जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(ऋषीकेश जाधव)**

पालघर / आज दिनांक ३/१/२०२५ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रूपाली सातपुते यांनी सावित्रीबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी ज्योतिराव फुले आणि



सावित्री बाई फुले यांच्या बद्दल महत्वपूर्ण माहिती उपस्थितांना दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी,शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी माध्यमिक संगीता भागवत, शिक्षणाधिकारी योजना शेषराव बडे, मोहीम अधिकारी (कृषी) विश्वजित माने तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले यांचा जन्म ३ जानेवारी, इ.स. १८३१ साली झाला.

सावित्रीबाई ह्या भारतीय शिक्षिका, कवयित्री व समाजसुधारक होत्या. फुले यांनी आशिया खंडातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतीराव फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रोवला असून त्या भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका शिक्षीका होत्या. अशा थोर महिलेची आज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### NSS कॉलेज कॅम्पची मैत्री अल्पवयीन

# मुलीला व तिच्या मैत्रिणीला पडली महागात

## जंगलात नशा पाजून मित्राच्या नातेवाईक भावांनी केला लैंगिक अत्याचार..

## शहापूर पोलिस ठाण्यात पोकसोचा गुन्हा नोंद

**दोघांना अटक**

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**

मुंबई तील मुलुंड येथील एका शैक्षणिक संस्थे मार्फत आसनगाव येथे झालेल्या NSS कॅम्प मधील झालेली मैत्री दोघा मैत्रीणीना चांगलीच महागात पडली. मित्राच्या नातेवाईक भावांनी दोघींना फसवून आसनगाव नजीक वालशेत गावच्या हद्दीत असलेल्या जंगलात लैंगिक अत्याचार व विनयभंग केला.

मागील वर्षी २०२३ मध्ये NSS कॅम्प मुलुंड येथील एका शैक्षणिक संस्थे तर्फे आसनगाव ला आला होता.त्या वेळी शहापूर तालुक्यातील एका गावातील विद्यार्थ्याची ओळख मुलुंड मधील मुलीशी झाली होती. दोघांनी एकमेकांना बहीण भाऊ मानले होते.दोघांच्या घरी देखील हे माहीत होते.आसनगाव येथील एए कॅम्प संपल्या नंतर शहापूरमधील मानलेल्या भावाचा एक जिवलग मित्र आसनगाव स्टेशन वर मुलुंड मधील NSS कॅम्पच्या मुलीच्या बॅगा व इतर सामान लोकल ट्रेन मध्ये ठेवण्यासाठी मदत करत होता.या वेळी मुलुंडच्या मुलीचं व त्या मानलेल्या भावाचा मित्राने मोबाईल, फेसबुक, इंस्टाग्राम फोन नंबर एकमेकांना दिले.त्या नंतर या नवीन मित्राची व मुलीची घट्ट मैत्री सुरू झाली. वर्षभरात दोघांची जवळीक वाढली.

थर्टी फर्स्टच्या आधीच काही दिवसांपूर्वीच मुलुंडच्या मुलीने आपल्या घरी आई वडिलांना सांगून मी शहापूर चे भावाकडे दोन तीन दिवस राहायला जात आहे असे सांगून ती मानलेल्या भावाचे घरी आली.

एक जानेवारीला मानलेल्या भावाची बहीण व मुलुंडची मुलगी शहापूर बाजार पेठेत खरेदी करताना नवीन मित्राचे दोघं नातेवाईक भावांनी पाहिले.या दोघांना ही त्या ओळखत होते. आपण मानस मंदिर फिरून येवू.असे दोघे जणांनी विचारले. यावर दोघींनी स्पष्ट नकार दिला. आसनगाव स्टेशन जवळ नाश्ता घेवून नजीकच्या वाळशेत जंगलात बसून खावू असं सांगून चौघे एकत्र जंगलात आले.दुपारच्या वेळेस दोघं नातेवाईक भावांनी दोघींना फसवून नशा व विदेशी मद्य पाजले. त्या मुळे दोघी मैत्रिणी स्वतःचे नियंत्रण हरवून बसले. नशा पाजल्या नंतर दोघी मैत्रिणी घरी परतल्या. यावेळी एका मैत्रिणीच्या पोटात वेदना सुरू झाल्याचे पाहून दोघांनी दुष्य कृत्य केले असल्याची. माहिती शहापूरच्या मानलेल्या भावाची बहीनिने मुलुंडच्या मुलीला दिली .

तिने तात्काळ नवीन मित्राचे फोन वर त्याच्या नातेवाईक भावांनी केलेला लैंगिक अत्याचार प्रकार सांगितला.

या वेळी नवीन मित्राने कठोर निर्णय घेतला.नातेवाईक भावांनी केलेला लैंगिक अत्याचार प्रकार पाठीशी न घालता

काल दुपारी नवीन मित्राने मुलुंडच्या मुलीला सोबत घेऊन थेट शहापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. मैत्रिणीवर नातेवाईक भावांनी केलेला लैंगिक अत्याचार व विनयभंग केल्याप्रकरणी तसेच अल्पवयीन मुलीचे शोषण पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. शहापूर पोलिसांनी तात्काळ दोघाना अटक करून आज दुपारी कल्याण न्यायल यात सादर केले.

# राष्ट्रीय महामार्गावरील टोकावडे गावाचा नाम फलक गायब

## सार्वजनिक बांधकाम खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष!



**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी)**

कल्याण अहिल्यानगर पूर्वीचे अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग ६१ वरील प्रख्यात बस थांबा मुरबाड तालुक्यातील टोकावडे गावाला सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे लावण्यात येणारा नाम फलकच गायब झालेला दिसत असल्याने टोकावडे आहे की दुसरे गाव आहे असं चित्र समोर येत आहे.

माळशेज मार्गे जाणाऱ्या प्रवाशांना विशेषण नवख्या प्रवाशांना गाव कोणते असा प्रश्न विचारावं लागत आहे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या महामार्गावरील अति महत्त्वाच्या गावाला नाम फलक लावण्याबाबत सार्वजनिक बांधकाम खाते दुर्लक्ष करत असल्याने ग्रामस्थ नाराजी व्यक्त करीत आहेत

तालुक्याचे ठिकाण मुरबाड येथून २४ किलोमीटर तर कल्याण येथून त्रेपन्न किलो मीटर अंतरावर असलेल्या या गावातून कल्याण अहिल्यानगर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ मध्य भागातून जातो तालुक्या व्यतिरिक्त कल्याण, मुंबई, उल्हासनगर, शहाड, पालघर, ठाणे जिल्ह्यातील बहुतांशी गावाकडे तसेच महाराष्ट्रातील माळशेज घाट मार्गे याच गावातून लांब पल्ल्याची बस सेवा आहे पुणे अहिल्यानगर नांदेड परभणी बुलढाणा जालना लातूर अकोले धाराशिव चाळीसगाव अशा दूरच्या पल्ले च्या गाड्या या गावातून मार्गस्थ होतात अशा महत्त्वपूर्ण गावाला नाम फलकच गावाच्या वेशीवर नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. माळशेज घाटाकडून तसेच कल्याण कडून येताना नजरेत दिसेल असा मोठा नाम फलक गावाच्या दोन्ही बाजूला लावण्यात यावा अशी मागणी येथील प्रवासी वर्ग वाहन चालक ग्रामस्थ यांच्याकडून केली जात आहे तरी या बाबीची दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी अभियंता यांनी संबंधित अधिकारी वर्गाला तसे आदेश देऊन तात्काळ नाम फलक लावण्याची व्यवस्था करावी अशी मागणी पुढे आली आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(प्रतिनिधी)-**

महात्मा फुलेनीं सावित्रीबाई यांना एकच दागिना दिला तो म्हणजे शिक्षण. सावित्रीबाई फुले यांनी देखील अनेक संकटाचा सामना करत आपले जीवन संपूर्णपणे शिक्षणाद्वारे महिलांच्या उन्नतीसाठी समर्पित केले . महापुरुषांच्या विचारांचा वसा घेऊन आजच्या मुला-मुलींनी कपड्यामध्ये मॉडर्न राहण्यापेक्षा विचाराने मॉडर्न राहिले पाहिजे असे मत समाजसेविका डॉ. ज्योती ठाकरे यांनी व्यक्त केले. त्या पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे बी. एन. एन. महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, मराठी विभाग आणि महिला विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात, आजची तरूण पिढी व लिंग संवेदना या विषयावर बोलत होत्या.

यावेळी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. अशोक वाघ म्हणाले की, आताच्या पिढीने सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेऊन शिक्षण घ्यायला पाहिजे, शिक्षणाने माणूस मोठा होतो आणि जेवढा माणूस मोठा होतो तेव्हढा विनम्र देखील होतो असे मत व्यक्त केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, उपप्राचार्या डॉ. सुवर्णा रावळ, उपप्राचार्य डॉ. निनाद जाधव, डॉ. सुरेश भदरगे, प्रबंधक नरेश सिरसाळे, नॅक समन्वयक डॉ. शशिकांत म्हाळूणकर व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मयोगीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. शुभद्रा पाठक यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय डॉ. अलका कदम यांनी दिला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार डॉ. बाळासाहेब पगारे यांनी मानले.

### उत्कर्ष महाविद्यालयात

# क्रीडा महोत्सव उद्घाटन आणि प्रशस्ती पत्राचे वाटप



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(प्रतिनिधी)-**

समाज हितकारिणी संस्था संचलित उत्कर्ष महाविद्यालयामध्ये क्रीडा महोत्सव उदघाटन आणि प्रशस्ती पत्राचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयातील अंतर्गत असलेल्या क्रीडा महोत्सवाचेही उदघाटन करण्यात आले. तसेच विधानसभा निवडणूकीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विशेष पोलीस पथक म्हणून यशस्वीपणे काम केल्याबद्दल एकूण ४० प्रशस्ती पत्रकाचे वाटप करण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक हर्षवर्धन बारवे, संस्थेचे अध्यक्ष अरुण वारघडे, सचिव रामदास शेळके, प्राचार्य डॉ. शेषराव मसुडकर, पो.पाटील रामदास राव आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष अनिल मानिवडे, खजिनदार वृषाली जाधव, कार्याध्यक्ष दिपक सुतार, अंतर्गत हिशोब तपासणीस विश्वास परटोले, सहसचिव अरुण भालेकर, सर्व संचालक मंडळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, पोलिस निरीक्षक हर्षवर्धन बारवे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपले ध्येय निश्चित करून त्या दृष्टीने प्रयत्न केल्यास हमखास यश मिळते असा मोल ाचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शेषराव मसुडकर, सूत्रसंचालन प्रा. संदीप पवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन वेखंडे यांनी केले. यासाठी शिक्षक व शिक्षिकेत्तर, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते

# शहापूर शहरातील मुख्य रस्त्यांवर गतिरोधक व गटारांवरील झाकणे बसवावी अन्यथा जन आंदोलन छेडण्याचा इशारा



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)-**

शहापूर शहरातील मुख्य रस्त्यांवर गतिरोधक व गटारांची उघडी झाकणे ताबडतोब बसवावी अशी मागणी भाजपचे उपशहराध्यक्ष मनोज पानसरे यांनी नगरपंचायत विभागाकडे निवेदनाद्वारे केली असून यासंदर्भात योग्य ती दखल न घेतल्यास जन आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

शहापूर नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ सुरू असते. त्यातच याठिकाणी कुठेही गतिरोधक नाहीत त्यामुळे बेशिस्त वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवत असल्यामुळे अपघात होत आहेत. त्यामुळे ये-जा करणाऱ्या शाळकरी विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व इतरांना त्रासदायक ठरत आहे. तसेच बांधलेल्या गटारी वरील झाकणे मोडकळीस आल्याने अपघात होऊन जीवितहानी होण्याची दाट शक्यता असून उघड्या गटारींमुळे शहराला बकाळपणाचे स्वरूप प्राप्त झाले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सदर, दोन्ही विषयांचा गांभीर्यपूर्वक विचार करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून अन्यथा जन आंदोलन छेडले जाईल असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावेळी उपशहराध्यक्ष मनोज पानसरे यांच्या समवेत नगरपंचायतचे गटनेते तथा भाजपाचे शहापूर शहराध्यक्ष विवेकजी नार्वेकर, भास्कर भांगरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार हत्या प्रकरण

## केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांनी घेतली पीडित कुटुंबियांची भेट

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

कल्याण पूर्वेतील घडलेल्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार हत्या प्रकरणात आरोपी विशाल गवळी याला अटक झाली. या घटनेचा समाजातील सर्वच स्तरातून निषेध होत आहे. शुक्रवारी केन्द्रिय मंत्री रामदास आठवले यांनी कल्याण पूर्व परिसरात येत अल्पवयीन मुलीच्या लैंगिक अत्याचार व हत्या प्रकरणी पिडीत मुलीच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

यावेळी बोलतांना आठवले यांनी सांगितले की, महाराष्ट्रात लहान मुलींवर महिलांवर अत्याचारांच्या घटना होत आहेत माणुसकीला कलंक लावणाऱ्या घटना घडत आहेत. त्या घटना मधील घटना कल्याणच्या कोळशेवाडी मधील अत्यंत निर्घृण पद्धतीचे घटना घडली आहे. एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली. मी पीडित कुटुंबाची भेट घेतली आहे कुटुंबाने मला माहिती दिली आहे. हा आरोपी गुंड प्रवृत्तीचा आहे त्याच्यावर वेळेत कारवाई झाली असती तर हा प्रकार घडला नसता ज्या इमारतीमध्ये हा नराधम राहतो त्या बिल्डिंग ला महानगरपालिकेने तोडण्याची नोटीस दिली आहे. काही कुटुंबांनी या इमारतीतील घर खाली केली आहेत.ही इमारत ताबडतोब पाडण्यात यावी अशा सूचना महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. आरोपींना फाशीची शिक्षा होणे आवश्यक आहे. आरोपीला साथ देणारी त्याची पत्नी तिला देखील फाशी झाली पाहिजे. लोकांचा आक्रोश आहे लोकांची मागणी आहे. मुख्यमंत्री फंडातून या कुटुंबांना मदत मिळावी.

ही घटना योग्य नसून या घटनेचा मी निषेध करतो. सामाजिक न्यायचा मंत्री म्हणून या घटनेचा निषेध करतो अशा पद्धतीच्या घटनांना थांबवणे आवश्यक असल्याचे आठवले यांनी सांगितले.

# मायणी शाळेत दिवे पेटवून सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

महिलांना चूल आणि मूल या चौकटीतून बाहेर काढून त्यांना शिक्षित व स्वयंपूर्ण बनविणाऱ्या आद्य स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या मायणी शाळेत विद्यार्थिनींनी दिवे पेटवून सावित्रीबाई फुले यांना आगळीवेगळी आदरांजली वाहिली.



यावेळी केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी माहिती सांगताना म्हटले की, स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री पुरुष विषमता कमालीची होती स्त्री शिक्षणाकडे समाजाचे दुर्लक्ष झालेले होते. त्यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीला बाधा पोहोचत होती. अशावेळी सावित्रीबाई फुले यांच्या रूपाने क्रांतीची एक ज्योत पेटली व बघता बघता त्या ज्योतीचा प्रकाश सर्वदूर पसरला.तसेच शाळेचे मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याची ओळख देताना सांगितले की,आज स्त्रिया शिक्षित होऊन समाजातील सर्व स्तरांवर सन्मानाने कार्यरत आहेत याचे बीजारोपण सावित्रीबाईंनी केले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी कृतज्ञता म्हणून शाळेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्यासारखा वेश धारण करून दिवे पेटून त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती तसेच उपशिक्षक अमित महागावकर, रजनी शेंदाडे यांनी सहकार्य केले.

# सिद्धगड येथील समुहगान स्पर्धेत म्हसा महाविद्यालयाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त



**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता**
**मुरबाड(प्रतिनिधी)**

सिद्धगड स्मारक समिती मुरबाड यांच्या वतीने ०१ जानेवारी २०२५ रोजी सिद्धगड क्रांतीस्थळी हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा वीर हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त देशभक्तीपर कार्यक्रमामध्ये जिल्हास्तरीय समुहगान स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये ठाणे व रायगड जिल्ह्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. समुहगान स्पर्धेमध्ये सौ. कमलताई किसन कथोरे कनिष्ठ महाविद्यालय म्हसा येथील विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले याप्रसंगी भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश ( बाळ्यामामा ) म्हात्रे तसेच मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थित विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश माळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

# कल्याण तालुका गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा शिक्षक पुरस्कार अर्ज

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

क्रीडा क्षेत्राचे आधारस्तंभ आप्पा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त, कल्याण तालुक्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी तसेच क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने प्रतिवर्षी आप्पा शिंदे क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. यंदा पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे. उद्योजक विक्रांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, सचिव अविनाश नलावडे, यांनी आप्पा शिंदे क्रीडा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून कल्याण तालुक्यातील क्रीडा क्षेत्राला नव्याने झळाळी मिळावी या उदात्त हेतूने आप्पा शिंदे क्रीडा पुरस्कार सोहळा आयोजित करण्याचे योजले आहे. कल्याण तालुक्यातून ऑलिम्पिक आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत हा विचार आप्पा शिंदे यांनी उराशी बाळगला.

आप्पा शिंदे हे नेहमीच अनेक एकाविध क्रीडा संघटनांना तसेच अनेक होतकरू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक सहकार्य करत असतात. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या पुरस्कार सोहळ्याची सुरुवात झाली.आप्पा शिंदे क्रीडा पुरस्काराचे चे स्वरुप - आप्पा शिंदे क्रीडा पुरस्कार, प्रशस्तीपत्र आणि रुपये ५००१/- रोख असे असणार आहे. हा पुरस्कार सोहळा महाराष्ट्र राज्य क्रीडा दिनानिमित्त १६ जानेवारी रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शाळांमधील क्रीडा शिक्षक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित, स्वयं अर्थसहाय्यीत तसेच सर्व माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील क्रीडा शिक्षक तसेच उच्च माध्यमिक / कनिष्ठ व वरिष्ठ महा विद्यालयातील क्रीडा संचालक आणि सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत क्रीडा मंडळातील मार्गदर्शक यांनी पुरस्काराचा अर्ज, सचिव अविनाश नलावडे, ९९६७५०८८४८ यांच्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# झाडाच्या पानावर चित्र काढून सावित्रीबाईंना वाहिली आदरांजली



**दैनिक ठाणे जिवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

भारतीय सैन्य दलात सतरा वर्ष प्रदीर्घ सेवा केल्यानंतर सेवानिवृत्ती घेऊन गावी परतलेल्या हवालदार मंगेश पाटील यांचे वरसई फाटा ते आष्टे येथे मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात, भारताचा राष्ट्रध्वज तिरंगा हातात घेऊन, भारत माता की जय जय जवान जय किसान अशा घोषणा देत फुलांची उधळण करून, त्यांची रथामधून मिरवणूक काढण्यात आली .यावेळी गागोदे, वरसई, वशिवली, आष्टे आदि ठिकाणी मिरवणूक काढून त्यांचे औक्षण करण्यात आले.

पेण तालुक्यातील आष्टे गावातील मंगेश पाटील यांनी वरसई येथील कै पू.ग. गोडसे विद्यालय मध्ये १० वी पर्यत शिक्षण घेऊन पुढील शिक्षण पेण मध्ये केले , सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील व ग्रामीण भागातील तरुण लहानपणा पासून सैन्य दलात जायची इच्छा मनाशी बाळगून असल्यामुळे प्रयत्नशील होता व त्यातूनच तो भारतीय सैन्य दलात १७ वर्ष भारताच्या विविध कानाकोपऱ्यात सैन्य दलात सेवा केल्यानंतर हवालदार मंगेश पाटील सेवानिवृत्ती घेऊन तो १ जानेवारी २०२५ रोजी आपल्या मूळ गावी आष्टे येथे परतला. येथे भव्य दिव्य असे स्वागत करण्यात आले. भारत माता की जय, जय जवान जय किसान, घोषणा व फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण यामुळे वातावरण देशमय झाले होते. ढोल ताशाच्या गजरात कारमधून मिरवणूक काढण्यात आली तसेच वरसई विभागातील ग्रामस्थ, विविध संस्था ,संघटना यांच्या वतीने शाल ,पुष्पगुच्छ, पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त व सत्कारमूर्ती हवालदार मंगेश पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की,गावातील सर्वांनी एकत्र येऊन माझे जे अभूतपूर्व स्वागत केले, जो सन्मान केला, त्यामुळे मी खूपच भारावून गेलो आहे. देशसेवा करताना माझे घर, माझी शाळा, माझे गाव, माझे मित्र, याची मला नेहमी आठवण येत होती, देशसेवेमध्ये जो आनंद, स्वाभिमान ,अभिमान, शिस्त, स्वावलंबन व प्रामाणिकपणा शिकायला मिळाला. तो खूप मोठा आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर मनाला वाईट वाटते. मात्र यापुढेही इतर प्रकारे का होईना देश सेवा, समाज सेवा करत राहणार. व गावातील इतर तरुण मुलांना देश सेवेसाठी जाण्यासाठी प्रेरणा देत राहील. असे सांगितले व माझे स्वागत, माझा सन्मान केला त्याबद्दल सर्वांचे यावेळी त्यांचे आभार मानले. यावेळी माजी सैनिक, वरसई विभागातील कार्यकर्ते, तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्हैय्या परिवाराचे प्रमुख शांताराम मामा लंके यांचे दु:खद निधन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पारनेर(प्रतिनिधी)**

निघोज - हजारो हातांना रोजगार देणारे , शांत , संयमी , साधी राहणीमान असलेले दुग्ध व्यवसायातील दिग्गज , कन्हैय्या परिवाराचे प्रमुख , श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व श्री स्वामी समर्थ बँकेचे उपाध्यक्ष शांताराम मामा लंके यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी आज शनिवार दि. ४ रोजी पहाटे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले . त्यांचा अंत्यविधी आज शनिवारी दुपारी ३ वाजता निघोज येथे होणार आहे .



दुग्ध व्यावसायिकांचे आधारवड असलेले शांताराम मामा लंके यांच्या निधनाने निघोज परिसरातील सर्व व्यावसायिक , दुग्ध उत्पादक शेतकरी , ग्रामस्थ यांना धक्का बसला आहे . त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा कन्हैया दुग्ध व्यवसायाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मच्छिंद्र शेठ लंके , सून , ४ विवाहीत मुली , जावई , नातवंडे , भाऊ महानगर बँकेच बँकेचे संचालक बबनशेठ , भावजयी, पुतणे असा मोठा परिवार आहे . निघोज परिसराचा राज्यात नव्हे , देशात नावलौकिक व्हायला शांताराम मामा लंके व कन्हैय्या दुग्ध समुह आहे . दुध , दुग्धजन्य पदार्थ , दुध पावडर , शुद्ध पाणी बाटली , यामुळे कन्हैय्या हे नाव साता समुद्रापार गेले आहे . आज प्रति दिन लाखो लीटर दूध संकलीत करीत , हजारो दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी , हजारो कर्मचारी यांची रोजी रोटी बरोबरच त्यांच्या प्रगतीत कन्हैया परिवार व शांताराम मामा लंके यांचा सिंहाचा वाटा आहे , असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही .

शांताराम मामा लंके हे उत्तम प्रकारे शेती करत , त्यांना प्रगतशिल शेतकरी म्हणून तालुक्यात ओळखले जात असे , त्याचबरोबर ते स्वतः दुध उत्पादक होते , त्यांचा म्हशींचा गोठा प्रसिद्ध होता , पाहण्यासाठी लांबून लांबून शेतकरी येत असे . निघोज परिसरात मोठया प्रमाणावर दुध उत्पादन होत असे , पण दुधाला कमी दर व विक्रीत सातत्य नसल्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचा योग भाव , जाग्यावर खरेदी , खादय देण्याचा सर्वांत प्रथम उपक्रम शांताराम मामा लंके यांनी कन्हैय्या डेअरी या बॅनर ने सुरू केलेला उपक्रम , आज या व्यवसायाला विशाल स्वरूप आले आहे . त्यांनी व्यवसाया व्यतिरिक्त निघोज मधील गावगाड्या कडे ही लक्ष दिले . श्री स्वामी समर्थ बँकेचे उपाध्यक्ष उत्तम रितीने हाताळत , राज्यात प्रसिद्ध असलेल्या श्री मळगंगा मातेची सेवा करता करता , देवस्थान ट्रस्ट मध्ये आता ते अध्यक्ष म्हणून कार्यरत होते . त्याच बरोबर ते धार्मिक , आध्यात्मिक , शैक्षणिक , कृषी , सामाजिक क्षेत्रात सातत्याने अखेरच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिले . आज त्यांच्या अकाली जाणाने संपूर्ण निघोज परिसर स्तब्ध व पोरका झाला . त्यांच्या बद्दल किती ही बोलले , लिहिले तरी शब्द कमीच पडतील . त्यांच्या निधनाच्या निमित्ताने निघोज परिसरातील सर्व व्यावसायिकांनी आपापले व्यवसाय बंद ठेवून दुखवटा पाळला .

# घराघरात सावित्रीमाईचा फोटो लागलाच पाहिजे - उमेश पाटील

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

आज मुली सर्वाच क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती करत असून सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, प्रसंगी दगडगोटे खाऊन मुलींच्या शिक्षणासाठी सातत्याने झटत राहिल्या त्या सावित्रीबाई फुले यांची जयंती, बालिका दिन म्हणून राहनाळ शाळेमध्ये मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे असे उद्गार ग्रामपंचायतचे सदस्य उमेश पाटील यांनी काढले.




बालिका दिन म्हणजेच सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस राहनाळ शाळेमध्ये मोठा उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी मुलींनी सावित्रीबाईंच्या वेशभूषा केल्या होत्या. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी नेहा झुंजारराव या विद्यार्थिनींच्या अध्यक्षतेखाली बालसभा घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वी घारगे हिने केले. यावेळी शौर्य मत्रे, श्रावणी मत्रे, हर्षदा जाधव, वैष्णवी, रुही चिकणे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल माहिती सांगितली. तर इयत्ता तिसरीच्या आणि दुसरीच्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा गौरव करणाऱ्या ओव्या सादर केल्या.

शिक्षक अजय पाटील, अंकुश ठाकरे, संध्या जगताप यांनी मुलांना सावित्रीबाईंच्या बद्दल सविस्तर माहिती सांगितली. याचवेळी अजय पाटील लिखित 'आम्ही फुले बोलतोय' हा लघुपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. शिक्षण देणे आणि घेणं हे आज काळाची गरज आहे, शिक्षणानेच माणूस स्वतःची प्रगती करू शकतो असा संदेश अजय पाटील यांनी मुलांना दिला. आभार प्रदर्शन अर्णव खोपडे या विद्यार्थ्यांने केले.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ ची अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दि.१० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतरिम उत्तरसूची दि.११ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या अंतरिम उत्तरसूचीवरील लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

शिक्षक पात्रता परीक्षेच्या पेपर क्रमांक १ व पेपर क्रमांक २ च्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे दि.१६ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत पाठविण्याबाबत दि.११ डिसेंबर २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या अंतिम उत्तरसूचीनुसार महाटीईटी २०२४ परीक्षेचा निकाल यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थीनी नोंद घ्यावी, असे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी कळविले आहे.

# अज्ञात इसमाच्या वारसाचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे आवाहन

खर्डी : मुंबई-आग्रा महामार्गावरील खर्डी पुलाजवळ ७५ वर्षीय एक अनोळखी इसम फिरत असताना अचानक चक्कर येऊन पडला होता त्यात त्याच्या डोक्याला व हात-पायाला मार लागल्याने जखमी झाला होता.त्याला प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी मुंबई येथील जे जे रुग्णालयात पाठवला असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला .

रंग सावळा,सफेद दाढी,केस पांढरे व सडपातळ बांधा असे त्याचे वर्णन असून याबाबत कोणाला काही माहित असल्यास ०२५२७२७२०९० व ९८३३३ २६४६५ ह्या नंबर वर संपर्क करण्याचे सहा पोलीस निरीक्षक शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

# लाडक्या बहिणींच्या पैशांचं काय होणार ?

आमचं सरकार आलं तर आम्ही महिलांना २१०० रुपये देऊ अशी घोषणा देखील महायुतीकडून करण्यात आली होती. एकीकडे या योजनेतील लाभार्थी महिला खात्यामध्ये २१०० रुपये कधीपासून मिळणार याची वाट पाहात आहेत तर दुसरीकडे या योजनेतील लाभार्थी महिलांच्या संख्येला कात्री लावण्याचा विचार सरकारकडून सुरू असल्याचं समोर आलं आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी देखील याबाबत स्पष्ट केलं आहे. की ज्या महिलांच्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांच्या वर असेल, ज्या महिलांच्या मालकीची चारचाकी गाडी असेल, ज्या महिलांचं नाव बँकेमध्ये वेगळं आणि आधार कार्डवर वेगळं असेल, ज्या महिलांनी या योजनेंतर्गत दोन अर्ज भरले असतील अशा महिलांची तक्रार आल्यास त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळणी करण्यात येईल. असं तटकरे यांनी म्हटलं आहे.

# शिक्षणाबरोबर आता संस्काराची गरज आहे - गुलाबराव पाटील




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी)**

खडतर परिस्थितीत महात्मा ज्योतिबा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवले आणि संकटांवर मात करत पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढत स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली. आज प्रत्येक क्षेत्रात उच्च पदावर स्रिया कार्यात आहेत फक्त चूल आणि मूल राहिलेले नाही स्रिया उच्च शिक्षित झाल्या. परंतु आता संस्कार कमी पडत आहे अन्याय,अत्याचार, गुंड प्रवृत्ती, व्यसनाधीनता वाढत आहे याचा दुष्परिणाम परिवारावर होत आहे. याकरिता प्रत्येक घरात शिक्षणाबरोबर संस्कार देणे गरजेचे झाले आहे असे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी सम्राट अशोक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीच्या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले.

इयत्ता सातवी ते नववीच्या मुली सावित्रीबाईंच्या भूमिकेत शाळेत आल्या होत्या इयत्ता आठवीची विद्यार्थिनी अभिलाषा अजीत कदम मी सावित्री बोलते भूमिकेत विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट कथन केला व विद्यार्थ्यांना अभ्यास करा असाही सल्ला दिला कार्यक्रमात विद्यार्थी शिक्षकांबरोबर पालकांनी सहभाग घेतला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी